# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


क्र : मविनिआ/माअअ/66/2017/ 4205

दि. 18.09.2017

प्रति,
श्री. कमलेश शंकर गायकवाड,
38, जन.अरुणकुमार वैद्य नगर,
साक्री रोड, जि- धुळे 424001

विषय :- आपला दि. 07.08.2017 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 07.08.2017 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी त्यांचे पत्र क्रमांक माअअ-2017/प्र.क्र.652/ऊर्जा-2 दि. 14.08.2017 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 6 (3) अन्वये आयोगाच्या कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सदर अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 21.08.2017 रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1. | गट अ मधील एकूण मंजूर पदांवर पदोन्नतीचे सर्व टप्पे यातील आरक्षण अंतर्गत (एससी, एसटी, विजाभज व विमाप्र) प्रवर्गातील उमेदवारांना मंजूर केलेल्या पदोन्नत्यांचे विवरणपत्र (तक्ता) देण्यात यावा ही विनंती. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण 8 पृष्ठे आहेत). याव्यतिरिक्त आयोगाने तयार केलेली मानके महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांची सेवा-भरती आणि सेवा शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११ आयोगाचे संकेतस्थळ www.merc.gov.in आणि www.mercindia.org.in या वरुन मोफत स्वरुपात उपलब्ध/उतरवून घेवू शकता. |

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ८ | २ | १६/- | अंदाजे रु.४०/- | ५६/- |
| | | | एकूण रु. | ५६/- |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावेत.

सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

प्रत :

श्री. अ. सं. फडतरे
अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी
मुख्य इमारत,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा-२),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.